Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue 20 Vol. I
## on
## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
## Indian Society & Ideology of Disability

October 2019

**Associate Editor**
Dr. Shivaji Wadchkar

**Guest Editor**
Principal Dr. V.D. Satpute

**Assistant Editor**
Dr. V.B. Kulkarni
Dr. A.K. Jadhav
Dr. S.A. Tengse

www.publishjournal.co.in

Late Ramesh Warpudkar (ACS) College
Sonpeth
Dist.Parbhani



**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**October 2019 Special Issue- 20 Vol. I**

## भारतीय समाज और विकलांग (दिव्यांग) विमर्श
## Indian Society & Ideology of Disability

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Associate Editor**
**Dr. S.A. Wadchkar**

**Guest Editor**
**Dr. Vasant Satpute**

**Assistant Editor**
**Dr. V.B. Kulkarni**
**Dr. A.K. Jadhav**
**Dr. S.A. Tengse**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani



15. अपंगवशारिरीक दुर्बलता असणाऱ्या व्यक्तींना क्रीडा क्षेत्रातील संधी व त्यांचा सहभाग — 73
प्रा. वाकनकर गोविंद बन्सीधरराव

16. दिव्यांग अधिकार कायदा 2016 - एक संक्षेप — 77
डॉ. राजाराम झोडगे

17. अपंगाच्या विकासातील शासकीय योजना — 81
डॉ. वितेश भारत निकते

18. भारतीय मतीमंदात्वाची स्थिती — 84
प्रा. डॉ. प्रकाश रावसाहेब शिंदे

19. अपंग व्यक्ती व शासनाची भूमीका व कार्य — 87
प्रा.डॉ.अंभुरे एस.डी

20. सोशल मिडिया आणि फेकु न्युज — 90
प्रा.डॉ. आंधळे बी. व्ही,

21. **Disability & Literature** — 92
**Dr.Meena Surendra kadam**

22. **Differently Abled & Their Inclusion** — 96
**K.Saideepti**

23. **Disability : A Curse On Human Life** — 101
**Bais Sunita Manoharrao**

24. **Disability Divided in India** — 107
**Dr.Bhavna H. Parmar**

25. **The Implications of Socioeconomic Perception Of Disability in Ahmedabad** — 113
**Varma Kirankumari**

26. **Portrayal of Disabled in Rohinton Mistry's *Such a Long Journey* (1991)** — 121
**Mr. Rajesh S. Gore , Dr. Vasant .D. Satpute**

27. **Psychological Disorder in Rohinton Mistry's *Such a Long Journey*** — 129
**Dr. Jaybhaye Vithal K.**

28. **ICT Facilities and Services for Visually Challenge** — 134
**DR. ANANT B. SARKALE**

Late Ramesh Warpudkar (ACS) College
Sonpeth
Dist.Parbhani

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue XX , Vol. I
Octomber 2019 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 7.139

# अपंगवशारिरीक दुर्बलता असणाऱ्या व्यक्तींना क्रीडा क्षेत्रातील संधी व त्यांचा सहभाग

**प्रा. वाकनकर गोविंद बन्सीधरराव**
क्रीडासंचालक , कै.रमेश वरपुडकर महाविदयालय सोनपेठ, ता.सोनपेठ .जि परभणी

---

**प्रस्तावना:-**

देशात किंवा राज्यात झालेला विकास हा त्या देशाचा किंवा राज्याचा प्रगतीचा टप्पा मानला जातो. या प्रगतीच्या टप्यामध्ये क्रीडाप्रेमी व्यापारी मंडळ उध्योगपती, खेळांडू आणि मार्गदर्शक तसेच शासणाची भुमिका खुप महत्वाची असते. शारिरीक दूरबलता म्हणेजच अपंगत्व असता ना देखील मनाची ताकद प्रबल ईच्छाशक्ती आणि अखंड संचोती आणि परीश्रम याच्या जोरावर अनेक खेळांडूनी यश संपादन केलेले आपन पाहतो. दुरदैवाने वाट्याला आलेला अंपगत्व जुगारुन त्याच्यावर मात करुन विविध क्रीडा प्रकारात खेळाडू सरसावलेले दिसत आहेत. अशा अपंग खेळांडूना सातत्याने प्रोत्साहन देण्याचे प्रत्येक शासणाचे धोरण असते. या धोरणाच्या माध्यमातुन विविध योजना उपक्रम याद्वारे विविध संधी खेळांडूना मिळवुन दिल्या जातात. महाराष्ट्र शासन देखील अपंग खेळांडूच्या क्रिडा क्षेत्राच्या विकासासाठी विविध योजना व नाविण्यपुर्ण उपक्रम राबवत आहे. यातुन निर्माण झालेल्या संधीमुळे शारिरीक दुरबलतेसह विविध क्रीडा प्रकार गाजवणारे खेळांडू विकसीत झाले आहेत.

❖ **अपंग खेळांडूना मिळणाऱ्या संधी व त्यांचा खेळातील सहभाग:**

सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्र्यालयामधील अपंगत्व विभाग हा शारिरीक दुर्बल असणाऱ्या व्यक्तीना सबल व सक्षम रित्या तयार करण्याचे काम करतो. २००१ च्या जनगणणेनुसार ऐकुन लोकसंखेच्या २.१३. व्यक्ती या अपंग आहेत. आणि भारतीय राज्यघटने नुसार या व्यक्तींना देखील स्वातंत्र्य समता न्याय देण्यात आले आहे. अर्थातच अपंग नागरिकाना देखील. स्वत:च्या व देशाच्या विकासात हातभार लावण्याची घटनेने मान्य केले आहे.

**शासकिय योजनाद्वारे अपंग खेळाडुना मिळनारी संधी:-**

१) **ए.डी.आय.पी.योजना:-**या योजनेद्वारे अपंग व्यक्तींना आधुनिक टिकावू उपकरणे व ईतर साहित्य उपलब्द करुन दिले जाते, ही योजना स्वंयसेवी संस्था संबधीते मंत्रालय विभाग राष्ट्रीय संस्था यांच्यामार्फत राबवन्यात येते.

२) **अपंग व्यक्तींना राष्ट्रीय शिष्यवृत्ती योनजा:-**या योजने अंतर्गत दरवर्षी ५०० शिष्यवृत्ती जाहीर करण्यात येते व १० वी नंतर पुढील व्यावसायीक शिक्षणासाठी देखील ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

३) **अपंगासाठी स्वतंत्र्य क्रिडा प्रबोधनी:-**अपंग खेळांडुना व्यक्तीस खेळाचे योग्य मार्गदर्शन मिळावे

Late Ramesh Warpudkar (ACS) College
Sonpeth
Dist.Parbhani



४) म्हणुन अपंगासाठी पुण्याजवळ बालेवाडी येथे स्वतंत्र क्रीडा □कॅडमी सुरु करण्यात आली आहे.

५) **अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती:-**राज्याचे नाव उज्वल केलेल्या आणि सर्वोत्तम गुणवत्ता धारक अपंग खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्या संदर्भात निर्णय देण्यात आला आहे यामध्ये पॅराऑलम्पीक, कॉमनवेल्थ, इत्यादी स्पर्धाचा समावेश आहे. स्पर्धा, ज्युनियर वर्ल्ड पॅरा चॅम्पियनशिप स्पर्धा विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, स्पर्धेत सर्वोत्तम कामगीरी बजावलेल्या अपंग खेळांडूना शासकीय नोकरीची संधी देण्यात येते.

६) **राष्ट्रीय संस्था व अपंगाचे सक्षीमिकरण:-**अपंगाच्या सक्षीमीकरणाच्या धोरणासी सुंसगत राहुन व त्यांच्या वेगवेगळया समस्यावर मात करण्याच्या दृष्टीने प्रत्येक अपंगत्व प्रकारासाठी खालील राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. या संस्थेच्या माध्यमातुन अपंग खेळाडुंना योग्य मार्गदर्शन सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात.

1) दृष्टी अपंगासाठी राष्ट्रीय संस्था – डेहराडूम
2) अस्थीव्यंग अपंगासाठी राष्ट्रीय संस्था – कोलकत्ता
3) संर्वन अपंगासाठी आलियावरजंग राष्ट्रीय संस्था – मुंबई
4) मानसिक अपंगत्वासाठी राष्ट्रीय संस्था – सिकदंराबाद
5) पुर्णश्वसन प्रशिक्षण व संशोधनासाठी राष्ट्रीय संस्था –करक
6) शारिरीक अपंगत्वासाठी राष्ट्रीय संस्था –दिल्ली
7) बदुअपंग व्यक्तीच्या संबलिकरणासाठी राष्ट्रीय संस्था – चैन्नई

या संस्थेद्वारे अपंगाच्या क्रीडा विकासाला संधी मिळते.

७) अपंग व्यक्तीना सरळ सेवेमध्ये भरतीसाठी ३% आरक्षण दिले जाते तर पदोन्नत्तीमध्ये अपंग व्यक्तीना ३% आरक्षण दिले जाते.

८) सर्व योजनाची माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारीमार्फत सर्वांना ज्ञान केली जाते. खेळांडुना अपंगत्वामुळे स्वंयरोजगारासाठी क्रीडा भांडवल पुरवले जाते. प्रशिक्षित अपंगांना व्यवसायासाठी अर्थ सहाय्य दिले जाते.

वित्त व विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. ज्यामुळे अपंग खेळाडुं/व्यक्ती यांना या सर्व योजनांचा लाभ मिळावा हा उद्देश या योजनाचा आहे.

अपंग क्रत्रिम अवयव व साधणे पुरवणे. इत्यादी योजनादयारे अंपगाना खेळातील करिअरची संधी शासकिय स्थरावर उपलब्ध् करुन दिलेली आपणास पाहावयास मिळते

**अपंग खेळाडुंचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग:-**

1) **ऑलम्पीक क्रीडा क्षेत्रातील खेळाडु :-**ऑलम्पीक मधील व्हीलचेअर तलवारबाजी स्पर्धेत भारतीय संघाला सहाव्या स्थानी पदक मिळवुन देणारा खेळांडू संदिप प्रल्हाद गुरव त्याच बरोबर लगोरी स्पर्धेत उत्क्रष्ट

Late Ramesh Warpudkar College, Sonpeth, Dist. Parbhani



कामगीरी करुन पदक प्राप्त केले आहे. यामध्ये त्यानी रोप्यपदक, कास्यपदक, सुवर्णपदक इत्यादी पदके प्राप्त केलेली आहेत. त्याचबरोबर संदिपने विविध इंडोर व आउट डोर स्पधेत योगा, कराटे, क्लिक बॉक्सींग, रिंग टेनिस, एथेलेटीक्स, तायकवोदो, रोलबॉल मध्ये राज्यस्तरी स्पर्धेत पदके प्राप्त केली.

2) ऑलंम्पिकमध्ये टेबल टेनिसपटू मोलेसा टेपरने रिओ ऑलंम्पिकमध्ये सहभाग नोंदवला होता. ही स्पर्धा ऑस्ट्रेलियात मेलबर्न मध्ये झाली व पदक प्राप्त केले तसेच लासगो राष्ट्रकुल स्पर्धेत कास्यपदक प्राप्त केले व तीने सतत चार वर्षे या स्पर्धेत आपला दबदबा ठेवला.

3) ऑलंम्पिकमध्ये एथलेटीक्स मध्ये गोळा फेक (shotput) मधील मेडल प्राप्त केले खेळांडू दिपा मलिक भारतीय पहिली महीला खेळाडू ठरली.

4) पॅराऑलंम्पिक मधील खेळाडू कर्माज्योति दलाल हीने गोल्ड मेडल विजेती ठरली. तीने थाळी फेक (Disus through) मध्ये ५ मेडलची मानकरी ठरली आहे.

5) २०१६ च्या पॅराऑलंम्पिक मधील एथेलेटीक्स मधील उंच उडी प्रकारातील (High Jump) गोल्डमेडल विजेता मरियापन तेलंगू हा पदक खेळाडु ठरला आहे.

6) २०१६ च्या टोकियो ऑलंम्पिक मधील एथलेटिक्स भालाफेक (Towalin through) गोल्डमेडल प्राप्त अपंग खेळाडू देवेंद्र जहिरीया पदक विजेता खेळाडू ठरला आहे .

7) २०१७ च्या नॅशनल पॅरा पावरलिफटींग चॅम्पीयनशिप बॅंगलोर येथे गोल्डमेडल प्राप्त अपंग खेळाडू राजेंदर सिंग रहेलू. पदक विजेता ठरला आहे

8) १५००मी. धावणे मध्ये पॅराऑलंम्पिक स्पर्धेत गोल्डमेडल प्राप्त अपंग खेळाडू अंकूर धामा.

9) २०१५ च्या जलतरण मध्ये सुरेश नारायन जाधव अपंग खेळांडूने रियो ऑलंम्पिक स्पर्धेत गोल्डमेडल प्राप्त कलेले आहे.

10) २०१६ च्या आर्चेरीस्पर्धे मधील अपंग खेळाडू पुज्या राणी रिओपॅराऑलंम्पिक २०१६ मध्ये (Archery).पदक विजेता ठरला आहे

11) २०१६ च्या रिओऑलंम्पिक स्पर्धेत ५० मीटर शुटींग मध्ये मेडल प्रास केले. नरेश कुमार खेळाडू अपंग असून देखील त्याने नेमबाजी मध्ये पदक प्राप्त केले.

12) २०१४ च्या एशियान पॅरागेम्स मध्ये उंच उडी (High Jump) मधील अपंग खेळाडूने F42 उंच उडी मारुन त्याला गोल्डमेडल प्राप्त झाले. शरदकुमार हा एथलिटीक्सचा खेळाडू आहे.

13) रिओ ऑलंम्पिक २०१६ मध्ये संदिप ने भालाफेक मध्ये (Javalin Throw) मध्ये (f44) मध्ये गोल्डमेडल मिळवले आहे .

14) पॅरागेम्स २०१६ मध्ये व रियोऑलंम्पिक मध्ये 1.85m. उंच उडी (High Jump) मारुन गोल्डमेडल मिळवलेला हा अपंग रामपाल चेहर खेळाडूपदक विजेता ठरला आहे.

15) रिओ ऑलंम्पिक २०१६ मध्ये (गोळा व भाला) shotput a Javelin throw मध्ये विरेन्दर धनकर

Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist.Parbhani



ने गोल्डमेडल मिळवले आहे.

16) पॅराऑलंम्पिक एशियन गेम्स मध्ये Javalin throw भालाफेक मध्ये नरेद्रेश रनबीर खेळांडूने मेडल प्राप्त केले आहे.

17) रिकुं होंन्डा या खेळांडुने Javelin throw भालाफेक मध्ये २०१६ च्या पॅराऑलम्पीक मध्ये पदक प्राप्त केले.

18) २०१६ रिओ ऑलम्पिकमध्ये पावरलिफटींग मध्ये Powerlifting मध्ये फरमन भाशा याने मेडल प्राप्त केले.

19) पॅराऑलम्पीक 2014 च्या स्पर्धेत धरमबीर नाईस याने f(51) मी Club throw (कॅल्ब थ्रो ) मध्ये मेडल प्रापृत केले.

20) रिओऑलम्पीक मध्ये सुंदर सिंह गुजर याने Javelin Throw भाला फेक मध्ये मेडल प्राप्त केले.

21) अमित कुमार शारोहा याने (Club Throw) या खेळात पॅरा एशियन गेम्स मध्ये गोल्ड मेडल व सिल्वर मेडल प्राप्त केले.

**समारोप:-**

अशा प्रकारच्या शारीरीक दृष्टया दुर्बलता असताना अथक परिश्रम व मेहनतीच्या जोरावर अंपग खेळाडुनी वेगवेगळ्या क्रिडा कौशल्यामध्ये आपले वेगळा ठसा उमठवण्याचे काम केलेले दिसत आहे. यावरुन शारीरीक दृष्ट्या कमकुवत जरी असले तरी त्यांनी क्रिडाक्षेत्र निवडून आपण सक्षम असल्याचा दाखला दिलेला दिसतो, म्हणजेच शारिरीक स्थितीची कमतरता असताना त्यांनी वेगवेगळया क्रीडा क्षेत्रा कौशल्य त्याचे नाव कोरण्याचा प्रयत्न केलेले दिसतो. त्याप्रमाणे या सर्व संधीचा फायदा यांनी नक्कीच उचलला असे म्हणणे येथे योग्यच आहे. कारण त्यांनी अथक परिश्रम घेवून या स्पर्धेत सहभाग नोंदवला व खेळत खेळत सर्व स्पर्धे मध्ये पदक प्राप्त करुन अपंगासाठी सोयी सुविधाचा त्यांनी योग्य रित्या अंगिकारल्या व त्यांनी उपलब्ध् संधी चा फायदा घेउन खेळात सहभाग नोंदवला

यावरुन खेळाडू हा शेवटी खेळाडूच असतो ती शारिरीक दृष्ट्या जरी कमकुवत असला तरी तो खेळामध्ये परिपुर्ण असतो असे म्हणणे गैर ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ**

1. दै. महाराष्ट्र टाईम्स 09/07/2016 & 07/02/2008
2. दै. लोकसत्ता
3. दै. लोकमत – 2013.08.ऑगस्ट
4. दै. दिव्य मराठी – 10 जुन 2016
5. शारिरीक शिक्षण– आलेगावकर
6. www.india.gov.in

Principal
Late Ramesh Warpudkar (ACS)
College.Sonpeth Dist Parbhani